## 'जोगिया'चे जनक : ग. दि. माडगूळकर

कै.ग. दि. माडगूळकर म्हणताच आपणांस गेली पन्नास वर्षे महाराष्ट्रातील लोकांच्या कंठात घर करुन राहिलेले गीत रामायण, अनेक अमर चित्रपट आणि चित्रगीते यांची आठवण होते. आपणासमोर एक प्रौढ आणि सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व उभे राहते. १४ डिसेंबर १९७७ रोजी गदिमा हे काळाच्या पडद्याआड गेले. त्यांना जाऊन आता तीन दशके झाली आहेत.

कै. ग. दि. माडगूळकर यांचा जन्म १९१९ सालचा. सांगली जिल्ह्यातील माडगूळ हे त्यांचे खेडेगांव, त्यांनी आपल्या साहित्याने महाराष्ट्राच्या नकाशात अधिक स्पष्ट केले आहे. १९३७ ते १९७७ या सुमारे चाळीस वर्षाच्या काळात माडगुळकरांची साहित्य सेवा मराठी शारदेच्या चरणी रुजू झाली आहे. पुष्कळ वेळा दैव काही देत नसते. ते बरीचशी प्रतिकूलता देते आणि या प्रतिकूलतेतून वाट काढावी लागते. गदिमा हे याचे उत्तम उदाहरण आहे. अत्यंत अस्थिर अवस्थेत, गरीबीला तोंड देत माडगूळ, औंध, कुंडल अशा गावातून अण्णा माडगूळकरांचे शिक्षण झाले. आयुष्याने माडगुळकरांना अनेकदा रडविले आहे. त्यांच्या तरुण अवस्थेपर्यंतच्या आयुष्यावर अश्रूंचा आणि कष्टाचा सडा पडलेला आहे. पण हे सारे पचवून ते स्वसामर्थ्यावर उभे राहिले. कोल्हापुरातील चित्रसृष्टीत मा. विनायकांकडे हरकाम्या म्हणून दाखल झालेला माडगूळच्या कुलकर्ण्यांचा मुलगा एक दिवस महाराष्ट्राच्या चित्रसृष्टीतील पटकथा, संवाद, गीते लिहिणारा रसिकमान्य श्रेष्ठ कलाकार झाला. माडगूळकर हे तसे नॉन मॅट्रिक पर्यंत शिकलेले पण त्यांच्या प्रतिभा सामर्थ्याकडे पाहून आचार्य विनोबांनी त्यांना सिध्दहस्त कवी म्हटले, तर कै. म. म. द. वा. पोतदार यांनी त्यांना आधुनिक वाल्मिकी म्हटले आहे. पण हस्त सिध्दहस्त होण्यासाठी आणि वाल्मीकिची व्यापक समदृष्टी व शाश्वत मूल्य शोधक दृष्टी येण्यासाठी लागणारी वाङ्मयीन बैठक त्यांनी या जीवनाच्या धकाधकीत मिळविली होती.

'बिनभिंतीची उघडी शाळा : लाखो इथले गुरु'

असे माडगुळकरांचे एक बालगीत आहे. या बिनभिंतीच्या उघड्या शाळेत माडगुळकरांचे अनौपचारिक शिक्षण खूप झाले. जीवन विद्यापीठाच्या अनेक पायऱ्या ते चढले आणि उतरले. आणि म्हणूनच अनुभव आणि जन्मजात प्रतिभा यांच्या बळावर मराठी गद्य–काव्याची द्वारे माडगुळकरांनी लीलया उघडली. काव्याच्या क्षेत्रात आनंदोत्सव साजरा केला. चित्रपटाच्या कथांना नवे परिणाम दिले. आणि चित्रगीतांना जनसामान्यांच्या ओठावर आणून सोडले. बसल्या बैठकीला काव्य लिहिणारे आणि एकदा लिहिलेला शब्दही न खोडणारे माडगूळकर हा एक सदाबहार गीत पारिजात होता असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

अण्णांना मराठी वाडमय लेखनासाठी सुदैवाने सुमारे चाळीस वर्षे लाभली. या काळात त्यांनी गद्य आणि काव्याच्या दालनात अगदी सहज वावर केला. ते एक बहुप्रसव साहित्यिक होते. त्यांच्या एकंदर वाङ्मयीन कामगिरीकडे पाहिले म्हणजे प्रामुख्याने त्यांच्या काव्यप्रांतातील कामगिरीचा आलेख अधिक उंच दिसतो. १९३६/३७ साली औंधच्या शाळेत शिकत असताना वयाच्या पंधरा सोळाव्या वर्षी माडगूळकरांनी काव्याच्या प्रांतात प्रवेश केला. तेथपासून ते १९७७ मधील शेवटच्या 'पैरण' काव्य रचनेपर्यंत माडगूळकर काव्य लिहीतच होते. १९२० च्या सुमारास मराठीतील केशवसुतांनंतरची गोविंदाग्रज, बालकवी यांची पिढी दिवंगत झाली. त्यांच्याच काळात काव्य लेखनास प्रारंभ केलेले तांबे, बी., सावरकर आदी कवी त्यानंतरही काव्य लेखन करीत होते. रवि किरण मंडळाच्या रूपाने

माधव जूलियन, यशवंत, गिरीश यांची तिसरी पिढी पुढे आलेली होती. अशाच काळात माडगूळकर काव्य प्रांतात आले होते.

माडगूळकरांची पदे प्रथम कोल्हापुरातील मेळ्यात आली. त्यानंतर चित्रपटात आली. लोकप्रिय झाली. कालांतराने त्यांना आकाशवाणीचेही माध्यम लाभले. आणि मग माडगूळकारांनी कविता आणि गीते यांचे नाना घाट मराठी रसिकांना सादर केले. 'सुगंधी वीणा' हा माडगूळकरांचा पहिला पद संग्रह १९४९ साली रसिकापुढे आला. तेथून पुढे एक काव्य मालिकाच सुरु होते आणि माडगुळकरांच्या लेखन झपाट्याचा अचंबा वाटतो. व्रतस्थ कवितांचा जोगिया, चार संगीतिका, गीतरामायण, चैत्रबन, चार काव्यकथा, 'गीत सौभद्र', 'गीत गोपाल', 'नृत्य नाटिका', 'दे टाळी ग घे टाळी' हे काव्य संग्रह रसिकांपुढे आले. असंख्य बालकथा, आपल्या बाळांसाठी शशांक मंजिरी हे नाटुकले आणि मिनी ही बाल कादंबरी आली. सर्व साधारणपणे चाळीस वर्षांच्या काळात चित्रगीते तर अण्णांनी शंभरावर चित्रपटांसाठी लिहिली आणि ऐंशीहून अधिक बोलपटांच्या कथा अण्णांनी लिहिल्या.

या साऱ्या निर्मितीकडे नजर टाकताच जाणवते की, निमित्त चित्रपटांचे असो, संगीतिकेचे असो की, नृत्यनाटिकेचे असो हा कवी लेखणी घेऊन आपल्या वाणाने उभा आहे. चित्रपटांच्या गीतांचे एक तंत्र, तर स्वान्त सुखाय उत्कृष्ट काव्य वेगळे. नृत्य नाटिकेत बाज वेगळा, तर संगीतिकेत एक वेगळे तंत्र!

हा संगीतिकेचा प्रकार सहज पचवून पुन्हा संपूर्ण रामायणाचा पट समोर उभा राहिल अशी गीत रामायणाची रचना ते अवघ्या छपन्न गीतात अत्यंत रोचकपणे साकार करतात.

' अंधारी तरुण कुणी दडला। रँडसाहेबांचा खून पडला। जी. जी.' असा टिळकांचा पोवाडा!
वयात ऐन विशीत माडगूळकरांनी 'मायबोलीचा किल्ला आता घ्यावा कोणा करी तेवढे सांगा ना गडकरी'
अशी रचना केली होती. मला वाटते, शब्दांशी उत्तम मैत्री करून गडकऱ्यांच्या माघारी अण्णांनी माय मराठीचा किल्ला सांभाळला होता.

अण्णा कविता, लावणी, पोवाडा, गीते, नृत्य नाटिका, समरगीते एकाच काळात लिहित होते. एक सांधा बदलताना त्यांचा दुसऱ्यावर परिणाम नाही! हे वाणी सामर्थ्य त्या अण्णा माडगुळकरांच्या हृदय–पिंड मातीचे! अण्णांच्या काळात तर अण्णा चित्रकथा आणि चित्रगीते यांचे गगनचुंबी शिखरच होते. शब्द साधे, पण ते अण्णा एकमेकांना काही खास पध्दतीने बांधीत.

प्रसाद हा काव्याचा एक महान गुण गणला तर अण्णांनी काव्य रचना म्हणजे प्रासादिक काव्याचा मराठीच्या प्रांतातला आनंदोत्सव म्हटला पाहिजे. मला अण्णांच्या ' गीत सौभद्र' रचनेचे अधिक कौतुक वाटते. अण्णा किर्लोस्करांच्या 'गीत सौभद्र' मधील गद्याचेही अण्णा माडगुळकरांनी पद्य कसे करुन टाकले की मूळ अण्णा किर्लोस्करांच्या पदाजवळ हे पद्य उगाच ठिगळाची घोंगडी न वाटता काश्मिरी शेल्यासारखे नाजूक वस्त्र बनून गेले आहे. हा प्रयोग केवळ धाडसी आहे आणि तो एक अण्णा माडगुळकरच करु शकतात. बरे बालकांसाठी बालकथा, नाटुकली, बालगीते अण्णांनी बालांशी मैत्री करीत लिहिली आहेतच.

अण्णांनी कथा, नाटक, प्रवास वर्णन, कादंबरी, आत्मवृत्तपर व ललित लेखनाने मराठी गद्याचेही दालन सजविले आहे. अण्णांची कथा दहा संग्रहातून मराठी रसिकांपुढे ऐन नवकथेच्या काळात आली हे लक्षणीय आहे. आणि

तिचीही मागणी होती हे समजून घेण्यासारखे आहे. 'आकाशाची फळे' या कादंबरीत मानवाची भूक हा अवघड असा विषय कलात्मक पातळीवर नेण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. उभे धागे ' आडवे धागे' ही त्यांची दुसरी कादंबरी त्यांनी मित्राच्या जीवनावर लिहिली आहे. 'युद्धाच्या सावल्या', तसेच 'परचक्र' ही नाटके लिहून अण्णांनी रंगभूमीचीही सेवा केली आहे. कलावंतांचे आनंद पर्यटन हे त्यांनी दिलखुलास प्रवास वर्णनही लिहिले आहे. 'मंतरलेले दिवस' या पुस्तकातील आत्मवृत्तपर लेखन हे मराठीतील आधुनिक वाल्मिकीचे आत्मवृत्त आहे. गतायुष्यातील दुःख, यातना आणि सुख यांना अण्णा मंतरलेले म्हणतात. भोगले ते मंतरलेले होते असे म्हणणाऱ्याचा संयम दाखवून अण्णांनी आपल्यातला उंच माणूस दाखविला आहे. माणूस अज्ञानी आहे. आपल्या भ्रमातच तो आयुष्य जगत असतो. त्याच्या ज्ञानाची घमेंड व्यर्थ आहे. असे जेंव्हा अण्णा लिहितात, तेव्हा त्या अज्ञान नियती अंगुलीचे दर्शन होते. नियती आणि माणूस यांचे परस्पर संदर्भ जेंव्हा अण्णा ललित लेखनात वर्णन करतात, तेंव्हा साऱ्या जीवनाची बेरीज–वजाबाकी समोर येते. अण्णासाहेब माडगूळकर कोणत्याही विद्यापीठाचे पदवीधर नव्हते. पण पुणे विद्यापीठाने त्यांना विद्वतजन सभेचे सन्माननीय सदस्य करुन घेतले होते. माडगुळकरांची मुद्रा मराठी वाङ्मय, मराठी इतिहास, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक इतिहास यांवर खचितच उतरली आहे. मराठी वाङ्मयात माडगुळकरांची ध्वजा उंच राहील आणि वाल्मिकी रामायणाइतकेच गीतरामायणालाही अमरत्व लाभेल यात मला शंका वाटत नाही.